महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

☎ 022-26383016/022-26383009
Email- ddadm.des@hotmail.com, dydiradm.des@maharashtra.gov.in

क्रमांक :परिपत्रक/सेवावि/२०२०/प्र.क्र.१७०/प्रशा-२/ ७८२ दिनांक : १५/१२/२०२०

**परिपत्रक**

**विषय : राजकीय दबाव आणण्यावर प्रतिबंध ......**
**संदर्भ : सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. सीडीआर-१००६/प्र.क्र.१२/०६/अकरा, दि. १७/०८/२००६.**

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ च्या तरतुदीनुसार शासकीय कर्मचा-यांनी त्यांच्या सेवेसंबंधीच्या कोणत्याही बाबीसंबंधात राजकीय पुढा-यांकडून दबाब आणणे ही गैरवर्तणुक आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १७/०८/२००६ चे परिपत्रक अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

२. सदर नियमाची तरतुद असतानासुद्धा आणि या तरतुदींकडे वेळोवेळी लक्ष वेधण्यात येऊन सुद्धा संचालनालयातील अधिकारी / कर्मचा-यांकडून त्यांच्या सेवाविषयक वैयक्तिक कामे / बदली इत्यादी करुन घेण्यासाठी राजकीय व्यक्तिंकडून दडपण आणण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे.

३. तरी या परिपत्रकांन्वये कळविण्यात येत आहे की, अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिकारी / कर्मचा-यांनी त्यांच्या सेवाविषयक बाबींसंबंधीच्या तक्रारीचे निवारण आणि वैयक्तिक कामे / बदली इत्यादी करुन घेण्याकरिता राजकीय दबाव आणल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/०८/२००६ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनानुसार संबंधित अधिकारी / कर्मचा-यांवर कारवाई करण्यात येईल, यांची नोंद घेण्यात यावी.

(र. र. शिंगे)
संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे सर्व अधिकारी / कर्मचारी.

प्रत :
१. अपर संचालक (सर्व), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
२. सहसंचालक (सर्व), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
३. सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक// पुणे /कोकण यांनी सदर परिपत्रक आपल्या विभागातील अधिकारी / कर्मचा-यांच्या निर्देशनास आणून देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी.
४. उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे /कोकण.
५. कक्ष अधिकारी (का. १४२७) / (का. १४२६), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, (सर्व).
७. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा मानव विकास समिती, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व).
८. उप संचालक (प्रशासन), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
९. प्रशासन शाखा-१/२/३/४, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
१०. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, (सर्व).
११. निवडनस्ती.